# महानगरपालिकेच्या सन 2014&2015 चे अर्थसंकल्पातील कार्यात्मक समूहाची यादी व कार्यात्मक समुहा अंतर्गत असलेल्या विभागाचे विवरण

| अ. क्र. | कार्यात्मक समुह क्रमांक | कार्यात्मक समुहाचे नाव | कार्यात्मक समुहा अंतर्गत विभाग |
|---|---|---|---|
| 1 | **कार्यात्मक समुह –0** | सामान्य प्रशासन विभाग | वित्त व लेखा, स्थावर, सामान्य प्रशासन विभाग |
| 2 | **कार्यात्मक समुह –1** | नियोजन व नियमितीकरण | नगर रचना, इमारत, प्रवर्तन, अग्निशामक, इत्यादी |
| 3 | **कार्यात्मक समुह –2** | लोककर्म व नागरी सुविधा | लोककर्म, वाहतूक, विद्युत, कारखाना, बाजार, जलप्रदाय अग्निशामक,HMP,वाहतुक, इ. |
| 4 | **कार्यात्मक समुह –3** | आरोग्य | आरोग्य, दवाखाने, STP, जलप्रदाय, अग्निशामक, इ. |
| 5 | **कार्यात्मक समुह –4** | स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन | कोंडवाडा,साफसफाई, इ. |
| 6 | **कार्यात्मक समुह –5** | लोकशिक्षण | शिक्षण (प्रा.व मा) वाचनालय इ |
| 7 | **कार्यात्मक समुह –6** | नागरी वनीकरण व पर्यावरण संतूलन | उद्यान, क्रीडा, लोककर्म, |
| 8 | **कार्यात्मक समुह –7** | शहरी गरिबी निर्मुलन व समाज सेवा | दुर्बल घटक, समाज कल्याण, लोककर्म इ. |
| 9 | **कार्यात्मक समुह –8** | इतर सेवा | शिक्षण,उद्यान, PWD इ |
| 10 | **कार्यात्मक समुह –9** | महसूली व कर | मालमत्ता कर, स्थानिक संस्था कर, वित्त इ. |

# सन 2013&2014 चे सुधारीत व सन 2014&2015 चे प्रस्तावित अंदाजपत्रक स्थायी समितीस सादर करतांना ...

# निगम आयुक्त श्याम वर्धने यांचे भाषण

मा. अध्यक्ष, स्थायी समिती, समितीचे सर्व सन्माननीय सदस्य, सभागृहात उपस्थित माझ्या सहकारी मित्रांनो व उपस्थित सर्व पत्रकार बंधूनो महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराचा महानगरपालिकेचा सलग दुसरे वर्षीचे सन 2013–2014 चा सुधारीत व सन 2014–2015 चे प्रस्तावित अर्थसंकल्प स्थायी समितीचे मान्यतेस सादर करीत असतांना मी आपले मनःपुर्वक स्वागत करीत आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या नागरी प्रशासनाचे शतकोत्तर सुवर्ण वर्ष साजरे करीत असतांना राज्याची उपराजधानी म्हणून नागपूरच्या वेगळया समस्या, गरजा, आशा–आकांक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी या महानगरपालिकेवर आहे. याची जाणीव ठेवून त्यांचे प्रतिबिंब सन 2014–2015 च्या अर्थसंकल्पात राहील हा माझा प्रयत्न आहे. जागतिक मंदी, त्यामुळे धीमा झालेला विकास दर याचा देशाच्या हृदयस्थानी असलेल्या नागपूर नगरीच्या अर्थव्यवस्थेवरही परिणाम झाला आहे. 1 एप्रिल 2013 पासून लागू झालेला स्थानिक संस्था कर यामुळे जरी भविष्यात नागपूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अतिशय सुदृढ होणार असली तरी चालू आर्थिक वर्ष व पुढील वर्षात आर्थिक परिस्थिती थोडी पेचप्रसंगाची आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीवर इतर स्त्रोतामधून उत्पन्न वाढविण्याचे एक मोठे आव्हान समोर आहे.

सन 2013–2014 चे सुधारीत अंदाजपत्रक सादर करतांना चालू वित्तीय वर्षातील प्रथम आठ महिन्याचे प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न व पुढील चार महिन्यात अपेक्षित उत्पन्न विचारात घेवून सन 2013–2014 चा सुधारीत अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे.

नागपूर महानगरपालिकेचा सन 2013–2014 चा प्रस्तावित अर्थसंकल्प मी ज्यावेळेस सादर केला होता, त्यावेळी जकात करा पासूनची कर आकारणी पध्दती अस्तीत्वात होती व त्याप्रमाणेच जकात करापासून अपेक्षित उत्पन्न गृहीत धरण्यात आले होते व अंदाजपत्रकात त्याचा अंतर्भाव करण्यात आला होता. वरील सन 2013–2014 चे अंदाजपत्रक मी दि. 18/2/2013 ला सादर केले होते. त्यात तेव्हा जकात कर संपूष्टात येऊन स्थानिक संस्था करही लागु होण्याचा संभव व्यक्त केला होता. महाराष्ट्र शासनाची अधिसूचना दि. 20.2.2013 चे निर्देशानुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रात

जकात बंद करून त्याऐवजी स्थानिक संस्था कराची आकारणी लागु झाली. अश्याप्रकारे जर कराधान पध्दती बदलली तर मनपाच्या उत्पन्नावर परीणाम होण्याची शक्यता मी तेव्हाच वर्तविली होती व नवीन पध्दतीचे बळकटीकरण होईपर्यंतचा कालावधी अडचणीचा राहील हे सुध्दा तेव्हा मी माझ्या अंदाजपत्रकीय भाषणात नमुद केले होते.

शहराचा झपाटयाने होणारा विकास व त्यातुन निर्माण होणारी आर्थिक संपन्नता व समस्या यांचा सामना करण्यासाठी दर्जेदार मुलभूत सुविधा, आश्वासित सेवा, व कर्तव्य तत्पर नागरिक प्रशासन निर्माण करण्याचे दृष्टीने मनपा प्रशासन पुढील आर्थिक वर्षात कार्यरत राहील त्या अनुषंगाने सन 2014–2015 च्या अर्थसंकल्पाची मांडणी केली आहे.

नागपूर महानगरपालिकेस दि. 30 नोव्हेंबर, 2013 पर्यंत आठ महिन्याचे कालावधीत एकूण प्राप्त सकल उत्पन्न रू 440.52 कोटी असून, स्थानिक संस्था करापासूनचे उत्पन्नात यापूर्वीच्या वर्षातील जकातीव्दारा प्राप्त उत्पन्नाशी तुलना केली तर जवळपास अंदाजे रू 141.22 कोटी एवढी घट झाली आहे.

उत्पन्नातील घट विचारात घेता उत्पन्न व खर्च हयात संतुलनासाठी योग्य ते आर्थिक नियोजन करून सन 2013–2014 चे सुधारीत अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे. तसेच पुढील आर्थिक वर्षात (सन 2014–2015 मध्ये) अदत्त दायित्व राहणार नाही हयाकडेही पूरेपूर लक्ष देण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिकेचे सन 2014–2015 चे अर्थसंकल्पात एकूण प्रस्तावित आय रू 1061.51 कोटी अपेक्षित आहे. ह्यात दि. 1/4/2014 रोजीची राहणारी शिल्लक रू 10.33 लक्ष, स्थानिक संस्था करापासून रू 360 कोटी, मालमत्ता करापासून रू 183.09 कोटी, पाणी करापासुन रू 120 कोटी, आणि इतर सर्व बाबीपासून रू 398.31 कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

सन 2014–2015 च्या प्रस्तावित अंदाजपत्रकात प्रस्तावित खर्च रू 1061.35 कोटी असुन आस्थापना व्यय रू 260.68 कोटी, प्रशासकीय/संभाव्य खर्च रू 27.01 कोटी, सेवानिवृत्ती वेतन रू 100.00 कोटी, विविध विकास कामांच्या सुस्थिती व दुरूस्ती खर्च रू 178.33 कोटी, भांडवली खर्च रू 415.67 कोटी, व इतर उर्वरित बाबीवर खर्च रू 79.66 कोटी, असून शिल्लक रू 15.82 लक्ष राहण्याचा अंदाज आहे.

## महानगरपालिकेच्या उत्पन्ना बाबत

मनपाचे मुख्य आय स्त्रोतामध्ये वाढ होणे व त्या अंतर्गत उत्पन्नामध्ये वाढ होणे त्यासाठी नियोजनबध्द कार्यक्रम राबवून उत्पन्नाची उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी कार्यरत सर्व कर्मचारी, अधिकारी यांचा सहभाग व योग्य नियोजनबध्द प्रयत्न करण्यावर माझा भर राहील. अंदाजपत्रकीय अपेक्षित उत्पन्नाचे उद्दिष्ट आम्ही निश्चितपणे पार करू हयाचा मला पूर्ण विश्वास आहे.

## महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत

- **स्थानिक संस्था कर**

महानगरपालिकेचा सर्वात महत्वाचा उत्पन्नाचा स्त्रोत स्थानिक संस्था कर आहे. दि 1/4/2013 पासून मनपा क्षेत्रात जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर गोळा करण्यात येत आहे. जकाती पोटी मनपास रू 40 ते 45 कोटी उत्पन्न प्रतीमाह होत असे, स्थानिक संस्था करास व्यापारी संघटनाचा विरोध व आंदोलन हयामुळे मनपास एप्रिल व मे महिन्यात फक्त आठ कोटी उत्पन्न झाले व जवळपास अंदाजे रू 141.22 कोटी इतक्या मोठया रकमेची तुट मनपास झाली.

माहे एप्रिल ते नोव्हेंबर 2013 हया आठ महिन्याचे कालावधीत रहदारी पासेस व स्थानिक संस्था कराचे उत्पन्न रू 171.73 कोटी प्राप्त झाले. मुद्रांक शुल्कापोटी रू 38 कोटी पैकी आता पर्यंत हया महापालीकेस रू 28 कोटी इतके मुंद्राक शुल्क अनुदान प्राप्त झाले आहे. स्थानिक संस्था कर प्रणालीच्या बळकटीकरणासाठी आवष्यक ते सर्व प्रयत्न करण्यात आलेले असून सन 2013–2014 मध्ये उत्पन्नाचे सुधारीत उद्दिष्ट रू 360 कोटी असून सन 2014–2015 मध्ये हे उत्पन्न रू 440 कोटी होईल अशी माझी अपेक्षा आहे. आतापर्यंत 21916 व्यापारी नोंदणी झाली असून उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रशासन प्रयत्नरत आहेच. सन 2014–2015 चे मी निर्धारीत केलेले लक्ष्य रू 440 कोटी आम्ही निश्चितपणे गाठू हयाचा मला विश्वास आहे.

- **मालमत्ता कर**

नागपूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मालमत्ता कर हा दुसरा प्रमुख स्त्रोत आहे. नागपूर शहरातील मालमत्तांचा विचार करता मालमत्ता करापासून प्राप्त होणारे उत्पन्न अपेक्षेपेक्षा कमी आहे. माहे एप्रिल 2013 ते नोव्हेंबर 2013 हया कालावधीत मालमत्ता करापासून रू 57.80 कोटी प्राप्त झाले. सन 2013–2014 हया वर्षात रू 183.09 कोटी प्राप्त होतील असा अंदाज आहे.

सन 2014–2015 हया वर्षात मालमत्ता करापासून रू 191.36 कोटी इतके उत्पन्न अपेक्षीत असून ई–गव्हर्नन्सव्दारे विकसीत मोडयुलचा वापर करून कर आकारणी करणे व मालमत्ता कराची देयकेही या मोडयुलव्दारे काढणे सुरू आहे. मालमत्ता धारकांना ऑनलाईन तसेच ई पेमेंटची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच कर आकारणीचा संपूर्ण डाटाची ई–गव्हर्नन्सव्दारा विकसीत मोडयूलमध्ये नोंदी घेण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली.

महाराष्ट्र शासन, नगर विभागाचे दि. 5/6/2010 चे पत्रानुसार मालमत्ता करात सुसूत्रता आणण्यासाठी भांडवली मुल्यावर आधारीत कर प्रणाली लागू करणेसाठी कर आकारणीचे नियम व उपविधीचे प्रारूप दि. 08/11/2012 च्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहे. हयावर नागरिकांच्या सुचना व आक्षेप मागविले होते. मनपा सभागृहाने गठीत केलेल्या समितीने यावर सुनावणी घेवून पूणे महानगरपालिकेच्या कर आकारणी पध्दतीचा अभ्यास करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले असून कर विभागामार्फत हा अहवाल समितीस सादर करण्यात आला आहे. सन 2014–2015 हया वर्षात भांडवली मुल्यावर आधारीत मालमत्ता कर प्रणाली लागू व्हावी हा माझा व प्रशासनाचा प्रयत्न राहील.

नागपूर शहरातील मालमत्तांचे जी. आय. एस. मॅपींग करण्याचा प्रस्ताव असून त्यामुळे कर आकारणी न झालेल्या मालमत्तांचा शोध घेवून त्यावर त्वरीत कर आकारणी करण्यात येईल. हयासाठी सन 2014–2015 हया वर्षात "शोधमोहीम" राबवून उत्पन्नात वाढ करण्याचा माझा मानस आहे. त्याचप्रमाणे वापरात बदल केलेल्या मिळकती व भाडेकरू ठेवलेल्या मिळकतीवर कर आकारणीसाठी धडक मोहीम राबविण्याचाही माझा मानस आहे. जेणेकरून सन 2014–2015 चे मालमत्ता कराचे उद्दीष्ट रू 191.36 कोटी पूर्णत्वास आणता येणे शक्य होईल.

- **बाजार विभाग**

महानगरपालिकेच्या बाजार विभागाचे उत्पन्नात वाढ होण्यासाठी दुकांनाचे परवाना शुल्कात सुसूत्रता आणणे आवश्यक आहे त्यासाठी चालू वर्षात त्यासाठी प्रचलीत सिध्द शिघ्र गणकावर आधारीत भाडे निर्धारण पध्दतीचा अवलंब करण्याचे प्रस्तावित आहे. हा प्रस्ताव लवकरच स्थायी समितीसमक्ष मंजूरीसाठी आणण्यात येईल. ठराव मंजूर झाल्यास सन 2014–15 हया वर्षात शॉपरेन्ट हया शिर्षाअंतर्गत निश्चितपणे अधिक उत्पन्न मनपास प्राप्त होईल. बाजार विभागाने 7 झोन अंतर्गत एकूण 4431 मालमत्ता परवान्यावर आवंटीत केल्या आहेत.

मनपा अंतर्गत येणाऱ्या 10 अधिकृत बाजारांमधून महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे कलम 332 अन्वये बाजार सेवा शुल्क रू 10/– प्रति दिवस हया दराने घेण्यासाठी स्थायी समितीसमक्ष लवकरच प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. यासोबतच शहरातील अनधिकृत बाजाराचे अधिकृत बाजारात रूपांतर करण्यासाठी शहरातील राखीव जागांचा शोध घेण्यात आला आहे. नविन बाजार व्यवस्था प्रस्तावित करून व निश्चित धोरण तयार करून तसा प्रस्तावही लवकरच स्थायीसमिती/महासभेसमक्ष सादर करण्याचा माझा मानस आहे. याशिवाय सर्व सुविधा संपन्न हॉकर्स झोनचे निर्माण करण्याचा माझा प्रयत्न राहील.

नागपूर महानगरपालिकेने शासननिर्णय दिनांक 21.10.2013 व मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार मनपा क्षेत्रात "फेरीवाला धोरण" लागू करण्याचे निश्चित केले आहे. शहरातील सर्व हॉकर्स व्यावसायीकांची 100% नोंदणी करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

शहरातील जनतेला आरोग्य वर्धक मासोळी उपलब्ध व्हावी म्हणून मंगळवारी सदर बाजार येथे रू 2.99 कोटी चे अद्यावत व अत्याधुनिक मासोळी बाजार उभारला आहे. हया बाजारात चार होलसेल मासोळी साठवणूक व विक्रीकेंद्र आणि 104 किरकोळ विक्री केंद्रे तयार करण्यात आली आहेत. कॉटनमार्केट येथे दुसरा मासोळी बाजार प्रस्तावित आहे.

सक्करदरा मार्केट, महाल बुधवार बाजार, मंगळवारी सदर बाजार मच्छी मार्केटच्या बाजुला रिकाम्या खुल्या जागेवर भाजी व शॉपींग कॉम्प्लेक्स ची नवीन योजना प्रस्तावित असून हया योजनांचे कार्यान्वयन सन 2014–2015 हया वित्तीय वर्षात करण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे.

बाजार विभागाकडून 2014–2015 हया वित्तीय वर्षात रू 4.36 कोटी आय अपेक्षित आहे. वरील प्रस्तावित बाबी पूर्णत्वास आल्या तर मनपास अधिक उत्पन्न प्राप्त होणे अपेक्षित आहे.

- **नगर रचना विभाग**

नागपूर शहराची विकास योजना 2001 मध्ये अंतिमतः मंजूर करण्यात आली आहे. 20 वर्षामध्ये एकदा विकास योजना सुधारीत करण्याची तरतुद आहे. 2001 मध्ये मंजूर केलेली योजना 2020 पर्यंत लागू राहू शकते, परंतू गुंठेवारी विकास, मनपा हद्दीजवळ मिहानसारखा प्रकल्प व शहरात झालेला अनधिकृत अभिन्यासाचा विकास हयामुळे

नागपूर शहराचे बरेचसे स्वरूप विकास योजनेच्या स्वरूपाशी भिन्न आहे. परीणामतः नागपूर शहराची विकास योजना सुधारीत करणे आवश्यक आहे. विकास योजना सुधारीत करण्याचा माझा मानस आहे. सुधारीत योजना आधुनिक तंत्रज्ञानाने तयार डिजीटलाईज्ड असावी असा प्रयास आहे शासनाकडून हयासाठी "डिपी युनीट" बोलवावे लागेल. यासाठी आवश्यक प्रक्रीया सुरू करण्यात येत आहे.

शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहराच्या विकास आराखडयात सर्वांकष दुरूस्तीची/बदल करण्याची गरज आहे. बिल्डींग बायलॉज, डिसीआर, झोनींग, यामध्ये अधिक सुसूत्रता, सुलभता व मंजूरी प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणण्याची गरज आहे. शहरात नविन निवासी, वाणिज्यिक व इतर संस्था यांच्या बांधकामांना परवानगी देतांना शहरात मोकळया जागा, हिरवेगार पट्टे, उद्याने व जलाशये अबाधित राहतील व त्यामुळे सध्याच्या शहरातील नागरी सुविधांवर अतिरिक्त भार पडणार नाही याची दक्षता घेण्याची गरज आहे.

शहरातील दाटीवाटीच्या क्षेत्रातील चटई निर्देशांक वाढल्यामुळे बांधकाम प्रशमनाबाबत नवीन धोरण तयार करून त्यास मनपा सभागृहाची मंजूरी प्राप्त करून घेण्याचा माझा मानस आहे.

हयाशिवाय भूमिअधिग्रहण, पुरातत्ववास्तुंचे संवर्धन या बाबीकडे योग्य लक्ष पूरविण्यात येत आहे. "नियोजनबध्द नागपूर" हया धोरणाशी महापालिका कटीबध्द आहे.

- **महानगरपालिकेव्दारा प्रस्तावित कर्जाबाबत**

जकात कराचे तुलनेमध्ये स्थानिक संस्था करापासूनचे प्राप्त उत्पन्नामध्ये झालेली वित्तीय तुट भरून काढण्यासाठी व JNNURM प्रकल्पाअंतर्गत मनपाचे हिस्स्याची रक्कम तसेच मोठया भांडवली योजनासाठी लागणारा निधी कर्ज स्वरूपात घेण्याचा प्रशासनाचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या महासभेने मंजूर केला आहे. हया रकमेचा विनियोग मोठया भांडवली योजना, JNNURM च्या योजनांतील व BSUP च्या JNNURM योजनेअंतर्गत मनपाच्या हिस्साच्या खर्चासाठी करण्यात येईल. रू 200 कोटी कर्ज उभारण्याचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेस सादर करण्यात आला आहे.

शहरातील रस्त्यामध्ये वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे विद्युत खांब व इतर संलग्न साहित्य हटविण्यासाठी रू 50 कोटी कर्ज उभारणीस मान्यता देण्यासंबधीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे.

## महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या ठळक प्रकल्पाबाबत

- ### सिमेंट काँक्रीटचे रस्ते निर्माण

काँक्रीटचे रस्ते निर्माणासाठी पहिल्या टप्प्यात 30 रस्त्यांची निवड करण्यात आली असून त्यांची लांबी 25.93 किमी आहे. सिमेंट काँक्रीटचे रस्त्याचा खर्च रू 101.18 कोटी असून सद्यः स्थितीत ग्रेट नाग रोड जगनाडे चौका पर्यंत (दोन्ही बाजूने), अशोक चौकापर्यंत एका बाजुला व नंदनवन रोड हया रस्त्याचे काम प्रगतीत आहे यापुढे व्हीएनआयटी सेंट्रल बझार रोड चे काम हाती घेण्यात येणार आहे. सिमेंट रस्त्याचे हे काम पुढील वर्षात पूर्ण करण्याचा माझा मानस आहे.

- ### शहरातील रस्ते निर्माण व सुधारणा

मनपातर्फे सन 2002 मध्ये एकात्मिक रस्ते विकास योजने अंतर्गत शहरामध्ये 185 कि.मी. लांबीचे रस्ते बांधण्यात आले होते. या आर्थिक वर्षात यापैकी 59.00 कि.मी. लांबीच्या मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कार्यादेश देण्यात आले आहेत/देण्यात येत आहेत लवकरच हे काम पूर्ण करण्यात येईल. यासाठी रू 45 कोटी रकमेची तरतुद करण्यात आली आहे. रस्ते सुधार योजनेअंतर्गत जवळपास 100.00 कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरण, काँक्रिटीकरण करणे प्रस्तावीत आहे.

रस्ते डांबरीकरणाचे कामाकरीता Asphalt Milling Machine खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. हयाकरीता पुढील वर्षाचे अर्थसंकल्पात रू 2.50 कोटीची तरतुद करण्यात आली आहे. हया मशीनचा उपयोग रस्ते डांबरीकरण करण्यापूर्वी–रत्यावरील डांबर व डांबर काँक्रीट काढण्यासाठी करण्यात येईल तसेच मनपाचे हॉटमिक्स प्लँट करीता दोन टिप्पर खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. याकरीता सन 2014–2015 चे अर्थसंकल्पात रू 0.50 कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

- ### मायक्रोसरफेसींग व रिसरफेंसींग

डांबरी तथा सिमेंट काँक्रीट रस्ते देखभाल दुरूस्ती कामा करीता मायक्रोसरफेसींग ही पध्दती वापरण्यात येते. वेअरींग कोर्स स्पेशल डिझाईन देखभाल दुरूस्ती कामाकरीता मशीनच्या सहाय्याने 6 मी मी जाडीच्या थरात करता येते. सदर तंत्रज्ञानामध्ये POLYMER CATIONIC BITUMEN EMULSION वापरण्यात येते. या तं़त्रज्ञानामुळे रस्त्याचे आयुर्मान 5 वर्षे वाढून 5 वर्षे देखभाल दुरूस्तीची आवश्यकता राहत नाही. हे तंत्रज्ञान नागपूर शहरासाठी उपयुक्त ठरते किंवा कसे ही शक्यता पडताळून त्याबाबतची आवश्यक कार्यवाही सन 2014–2015 हया वित्त वर्षात करण्याचा मानस आहे.

- **नविन हॉटमिक्स प्लँट चे निर्माण**

सध्या कार्यरत असलेला हॉटमिक्स प्लँट ची क्षमता पूरेशी नसल्याने महानगरपालिका हॉटमिक्स प्लँट (प्रकल्प) एम आय डी सी हिंगणा येथे दुसरा नविन हॉटमिक्स प्लँट निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरीता सन 2014–2015 चे अर्थसंकल्पात रू 5 कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

- **जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थानांतर्गत प्रकल्प**

नागपूर महानगरपालिके मार्फत जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियानाची डिसेंबर 2005 पासून सुरूवात करण्यात आली. हया अभियाना अंतर्गत शहरातील भविष्यकालीन योजना व मुलभूत सुविधांचा विकास हा मुख्य उद्देश आहे.

- **या योजने अंतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्पः–**

| | | |
|---|---|---|
| एकूण प्रकल्प | **– 19** | प्रकल्पाची किंमत रू 1581.23 कोटी |
| मुलभूत सुविधा प्रकल्प | **– 17** | प्रकल्पाची किंमत रू 1504.18 कोटी |
| शहर वाहतूक | **– 1** | प्रकल्पाची किंमत रू 63.60 कोटी |
| ई प्रशासन प्रकल्प | **– 1** | प्रकल्पाची किंमत रू 13.45 कोटी |

वर नमूद एकूण 19 प्रकल्पापैकी 10 प्रकल्प पूर्ण झाले असून 9 प्रकल्पाचे काम प्रगती पथावर आहे.

- **नागपूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना पेंच टप्पा–4, भाग–1**

हया प्रकल्पामध्ये पंपींग हाउस, कन्हान व कोलार नदीवर पुलांचे बांधकाम व ग्रहण विहीरीचा समावेश असून 2300 मि.मी. व्यासाची एकूण 25.86 कि.मी भूमिगत पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम मार्च 2014 पर्यंत पूर्ण करण्यात येत आहे.

- **पेंच टप्पा–4, भाग–2**

गोधनी जलशुध्दीकरण केन्द्र ते राजभवन MBR पर्यंत 1422 मि.मी. व्यासाची 12.1 कि.मी. पाईपलाईन पैकी 9.35 किमी लाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले असून गोधनी येथे 115 द.ल.घ.मी. पाणी शुध्दीकरण केन्द्राचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. मार्च 2014 पर्यंत हे काम/प्रकल्प पूर्ण करण्यात येत आहे.

- **पेंच टप्पा–4, भाग–3**

**रा**जभवन (MBR) ते शहरातील विविध प्रस्तावित जलकुंभापर्यंत 35.7 कि.मी. D.I M.S. पाईप लाईन पैकी 31.91 कि.मी. पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम मार्च 2014 पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

शहरातील 24 जलकुंभापैकी (GSR+ESR) 20 जलकुंभाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित प्रगतीपथावर आहे.

- **सांडपाण्याचे पुर्नचक्रीकरण व पुनर्वापर**

नागपूर शहरातील 130 द.ल.लि. सांडपाण्यावर पुर्नचक्रीकरण करुन महाजेनकोच्या 3×660 मेगावॅट क्षमतेच्या प्रस्तावित कोराडी औष्णिक विज केन्द्राला पाणी पुरवठा करावयाचा आहे. या प्रकल्पाला केन्द्रशासनाची मंजूरी प्राप्त असून हा प्रकल्प JNNURM अंतर्गत आहे. प्रकल्पाचे काम भांडेवाडी येथे सुरू असून हया प्रकल्पास मार्च 2014 पर्यंत कार्यान्वीत करण्याची योजना आहे.

या प्रकल्पामुळे नागपूर महानगरपालिकेस दरवर्षी रु. 15.00 कोटी महसूल महाजेनको कडून मिळेल व दर तीन वर्षानी त्यात 10 टक्के वाढ होईल. अशीही करारनाम्यात तरतूद करण्यात आली हयामुळे मनपास आर्थिक फायदा होईल व स्वच्छ पाण्याची बचत होईल. सांडपाण्यामुळे होणाऱ्या प्रदुषणावर आळा घालता येईल. देशातील हा पथदर्शी प्रकल्प आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करून याव्दारे उत्पन्न प्राप्त करणारी नागपूर महानगरपालिका पहिली महानगरपालिका आहे.

- **अखंडीत पाणी पुरवठा प्रकल्प 24x7 जलपूर्ती**

नागपूर शहरात अखंडीत पाणी पुरवठा असावा हयासाठी मनपाने स्वमालकीची नागपूर एन्व्हायरमेंटल सर्व्हिसेस कंपनी (NESL)स्थापन करून पाणी पुरवठयाची सर्व कामे मे. ऑरेंज सिटी वॉटर प्रा. लि. यांना मंजूर निविदा दर व कराराप्रमाणे दिली आहेत.

सध्या हया योजनेखाली शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थापनासाठी 67 जलकुंभ, पाणी वितरण प्रणाली करीता विभागण्यात आले असून प्रत्येक जलकुभांचे भागात 24x7 पाणी पुरवठा करण्यासाठी जलवाहीन्या टाकणे, नळ कनेक्शनचे नुतनीकरण करणे, नवीन वॉटर मिटर बसविण्याचे कामास सुरूवात करण्यात आली आहे.

हया प्रकल्पाचे अधीन सन 2014–2015 मध्ये खालील कामे घेण्यात येणार आहेत.

या योजने अंतर्गत एकूण 574 किमी जलवाहीन्या टाकण्यात येणार असून त्यापैकी 250 किमी. चे काम पूर्ण झाले आहे. सन 2014–2015 मध्ये उर्वरित 224 किमी च्या जलवाहिन्या नेटवर्क पूर्ण करण्यात येणार आहे.

अतिरिक्त 82 Flow Meter बसवावयाचे असून त्यापैकी 12 Flow Meter बसविण्यात आलेली आहेत. उर्वरित Flow Meters या वित्तीय वर्षात बसवुन हे काम पूर्ण करून घेण्याचा माझा निश्चित प्रयत्न राहील.

शहरातील 42 जलकुभांपैकी 26 जलकुंभाचे पूनर्वसनाचे काम सुरू करण्यात आले असून उर्वरित कामे तसेच पेंच टप्पा –2 जलशुध्दीकरण केंद्राचे पुनर्वसन गोधनी रोडपासून पेंच टप्पा .–1, 2 व 3 पर्यंत 2000 मि.मी व्यासाची जलवाहीनी टाकून गोरेवाडा तलावाचे उत्सर्गावर नवीन गेटची उभारणी ही कामे सन 2014–2015 हया वर्षातच 100 टक्के पूर्ण करण्याचा माझा निर्धार आहे.

संपूर्ण भारतात नागपूर शहरात राबविण्यात येणारी ही योजना अत्यंत औत्सुक्याचा विषय ठरली असुन खाजगी सहभागातून (Private Public Partnership) ही साकारली आहे. योजनेचे ध्येयपुर्तीकडे मार्गक्रमण सुरू आहे.

ग्लोबल वॉटर इंटेलीजन्स ऑर्गनायझेशन, स्पेन हयांचे कडून पीपीपी धर्तीवरील आदर्श योजना म्हणुन हया योजनेस स्पेनमध्ये गौरविण्यात आले असून सन 2012–2013 मध्ये पुरस्कृत करण्यात आले आहे. "फर्स्ट 10 इमर्जींग पार्टनरशीप मध्ये समावेश करून आय एफ सी ["इंटरनॅशनल फायनान्स कार्पोरेशन (जागतिक बँक)]" सन 2013 मध्ये नागपूर मनपाने अंगीकार केलेल्या हया PPP Model ला पुरस्कृत केले आहे. नागपूर महानगरपालिकेसाठी ही निश्चितच गौरवास्पद बाब आहे.

- **टँकरव्दारे पाणीपुरवठा**

शहरात अखंडीत पाणीपुरवठा योजना सुरू झालेली असली तरी सीमावर्ती क्षेत्रात गुंठेवारी कायद्याने नागपूर सुधार प्रन्यास व्दारा नियमित करण्यात आलेल्या अभिन्यासात जलवितरण प्रणालीचा विकास न झाल्याने मनपा टँकरव्दारे पाणीपुरवठा करते ज्या अभिन्यासात जलवाहीन्या नासुप्रव्दारा टाकण्यात आल्या आहेत त्यांना पाण्याच्या उपलब्धतेनुसार पाणीपुरवठा सुरू करण्याचा माझा मानस आहे. रहीवाशांना नळ कनेक्शन देवून तेथील टँकरव्दारे पाणीपुरवठा कमी करण्यासाठी माझा प्रयत्न राहील.

ज्या वसाहतीत नळाव्दारे पाणीपुरवठा शक्य नाही. अश्या ठिकाणी मोकळया मैदानात प्लॅटफॉर्म उभारून 5000 लीटरची टाकी स्थापीत करून त्यात टँकरव्दारे पाणी भरण्यात येईल व नागरिकांना उभारलेल्या हया टाकीच्या नळातुन पाणी भरता येईल ही शक्यताही अजमावून बघण्याचा माझा प्रयत्न राहील.

- **आर.ओ.बी./आर.यु.बी. चे बांधकाम**

संत्रा मार्केट येथील रामझुला उड्डाणपुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. गेली अनेक वर्षापासून नागपूर शहरातील नागरीक रामझुल्याच्या पुर्णत्वाच्या प्रतिक्षेत होते तो पूर्ण करण्याचा माझा मानस आहे. कळमना येथील उड्डाणपुल पूर्ण झाला आहे.

आनंद टॉकीज जवळचा रोड अंडरब्रीज पूर्ण झाला असून वाहतूक सूरू आहे. बस रॅपीड सिस्टीम अंतर्गत आउटर रिंगरोड साठी तपशीलवार प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले असून हयाबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**शहर बस वाहतुक**

नागपूर महानगरपालिकेतर्फे शहर बस वाहतुक संचलित केली जाते (स्टार बस सेवा) सध्या शहरात 240 स्टार बसेस व्दारा वाहतूक सुरू आहे. या व्यतिरिक्त आणखी 200 बसेस जे एन एन यु आर एम अंतर्गत मिळणेबाबत तपशीलवार अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. हा प्रकल्प अहवाल येत्या 15 मार्च पर्यंत केंद्रशासनास राज्यशासना मार्फत सादर करण्याचा माझा प्रयत्न राहील.

**इतर प्रकल्प**

**ई–प्रशासन व्दारा स्मार्ट सिटी नागपूर**

मनपाने "ई–प्रशासन" प्रणाली सुरूवात केली आहे. हया माध्यमातून मालमत्ता कर भुगतान, विवाह नोंदणी, जन्म–मृत्यु नोंदणी, घराचा नकाशा मंजूरी, तक्रार नोंदणी अशा अनेक सेवांचा लाभ घेण्यास नागरिकांनी सुरूवात केली आहे.

- **महानगरपालिका मोबाईलवर**

महानगरपालिकेच्या ई–प्रशासन प्रणाली सोबत नागरिकांना मोबाईलव्दारे थेट संपर्क साधता येईल. स्मार्ट फोन मध्ये एनएमसी व्दारा अप्लीकेशन तयार करण्यात येईल ही "एनएमसी अप्लीकेशन" स्मार्ट फोन धारक आपल्या मोबाईल हॅन्डसेट मध्ये डाऊन लोड करू शकेल व त्यामार्फत मनपाच्या सुविधांचा (ई प्रशासन)लाभ घेता येईल.

प्रशासनाचा हा प्रस्ताव स्थायी समितीने मंजुर केला असून लवकरच कामकाजास सुरूवात करण्यात येईल.

- **मनिषनगर येथे उड्डाण पूल**

सोमलवाडा स्थित रेल्वे गेट क्र. 120, मनिष नगर येथे रेल्वेचे गेट जवळपास दर 15 मिनीटांनी बंद होत असल्याने वाहतूकीची कोंडी निर्माण होते. याकरिता प्रथम चरणामध्ये रेल्वे गेटचे रूंदीकरण करण्याचे प्रस्तावित आहे, यासाठी रू. 81.59 लक्ष एवढी राशी रेल्वे विभागात जमा करण्यात आली आहे. हे काम रेल्वे विभाग करीत आहे. याबरोबरच येथे उड्डाण पूल बांधण्याचे प्रस्तावित करीत असून सर्वेक्षणाचे काम सुरू आहे हयासाठी सन 2014–2015 हया आर्थिक वर्षात रू. 2.00 कोटीची तरतूद केली आहे. हा उडडाणपुल मनिषनगर रेल्वे क्रॉसिंग ते उज्वलनगर पर्यंत राहणार आहे.

- **पारडी रेल्वे उड्डाण पूल**

भंडारा रोड गोमती हॉटेल ते पारडी नाका तसेच भंडारा रोड ते कळमना बाजार, भंडारा रोड ते देशपांडे ले–आऊट हा रस्ता अतिशय वर्दळीचा व अपघातप्रवण आहे. त्या रस्त्यांवर दररोज बाजार भरतो. शहरात येणारी व शहरा बाहेर जाणारी वाहतूक मोठया प्रमाणात आहे. यासाठी एकूण 4.10 कि.मी. लांबीच्या रस्त्यावर दोन रेल्वे उड्डाण पूल दोन भुयारी मार्गासह (ग्रेड सेपरेटर) बांधण्याचे प्रस्तावित आहे. पूलाचे बांधकामासाठी मनपाने कन्सल्टन्टची नियुक्ती केली आहे. हया आर्थिक वर्षात रू. 2.00 कोटी रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

- **इतवारी रेल्वे स्टेशन जवळील उड्डाण पूल**

हा पूल बांधण्याचे काम जेएनएनयुआरएम अंतर्गत प्रस्तावित आहे. हया उड्डाण पूलाचे टप्पा–1 चे बांधकाम पूर्णत्वास आले असून वाहतूक ही लवकरच सुरू करण्यात येईल. व नंतर अस्तित्वातील जुना पूल तोडण्याचे काम हाती घेवून तेथे नविन रूंद पूल (टप्पा–2) बांधण्यात येईल.

- **मस्कासाथ येथे रेल्वे उड्डाण पूल**

मस्कासाथ येथील रेल्वे लाईन वरील उड्डाण पूल बांधण्याचे काम जेएनएनयुआरएम अंतर्गत प्रस्तावित आहे. हया कामाच्या लॅन्ड लीजींग (जमीन भाडेपट्टी) प्रस्तावास रेल्वेने नुकतीच संमती दिली असून लॅन्ड लीजींग साठीची रक्कम रू. 46 लक्ष रेल्वेकडे नुकतीच जमा केली आहे. हे काम लवकरच सुरू करण्यात येत आहे.

- **जरीपटका येथील इटारसी रेल्वे लाईन वरील उड्डाण पूल**

हा पूल जिर्ण झाल्याने, वाहतूकीस बंद करण्यात आला आहे. या पूलाच्या सुस्थिती/दुरूस्तीचे काम रेल्वे डिपॉझीट तत्वावर करण्यास तयार आहे. रेल्वे विभागाने मागणी केल्याप्रमाणे रू 25,88,178/— एवढया रकमेचा मनपाने रेल्वेकडे भरणा केला आहे. हे काम लवकरच सुरू होईल.

- **अजनी रेल्वे स्टेशनजवळील उड्डाण पूल**

अजनी रेल्वे स्टेशनजवळील जुना उड्डाणपूल 125 वर्षापूर्वीचा असून रेल्वेने बांधला आहे सध्या हा पूल जीर्ण झाला असल्याने नविन पुल अजनी रेल्वे स्टेशन ते तुकडोजी पूतळा चौक ते वंजारी नगर ले आऊट मार्गे धनवटे नॅशनल कॉलेज चुनाभटटी पर्यंत प्रस्तावित आहे. हा उड्डाणपूल नागरिकांना अत्यंत सोयीचा ठरेल. या पुलाचे कामाचे अपेक्षित ढोबळ प्राक्कलन रू 300 कोटीचे आहे. हयासाठी विस्तृत प्रकल्प अहवालाच्या प्रस्तावास स्थायीसमितीने मान्यता दिली आहे.

- **नागपूर महानगर क्षेत्रात मेट्रो**

नागपूर महानगरपालिका क्षेत्रात मेट्रो रेल्वे प्रकल्पास महानगरपालिकेने मान्यता दिली असून केंद्र शासनाव्दारे ज्या रकमेचा डिपीआर मंजूर होईल त्याचा 5 टक्के वाटा मनपा वहन करेल हा वाटा रू 450 कोटी एवढा राहील. सरासरी सहा वर्षाच्या प्रकल्प कालावधीत हया रकमेचे प्रदान करावयाचे आहे. प्रकल्पास राज्यशासनाची मंजूरी प्राप्त झाली आहे. पुढील प्रक्रियेसाठी केंद्र शासनास प्रस्ताव पाठविला आहे.

- **महानगरपालिकेची हद्द वाढ**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र शासन राजपत्र दि. 14 मे 2013 अन्वये नागपूर शहराच्या सीमा शेजारी आहे अशा नरसाळा व हुडकेश्वर बुद्रुक या गावचे पूर्ण क्षेत्र 972.82 हेक्टर चा समावेश नागपूर मनपा क्षेत्रात केला आहे. या क्षेत्राचा योग्य विकास व नागरिकरण करण्याची जबाबदारी आता महानगरपालिकेची असल्याने या गावाचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे. यासाठी विविध सर्वेक्षण अभ्यास अहवालाच्या आधारे अद्यावत तंत्रज्ञान वापरून जी आय एस संगणक प्रणालीमध्ये प्रारूप विकास आराखडा व नकाशे तयार करण्यात येईल.

- **शहरातील तलावांचे पुनरूज्जीवन प्रकल्प**

नागपूर महानगरपालिके तर्फे सक्करदरा, संजयनगर, पारडी, सोनेगाव, फुटाळा, अंबाझरी, पांढराबोडी, गोरेवाडा, नाईक तलाव, लेंडीतलाव व गांधीसागर या तलावांचे पुनरूज्जीवन प्रस्तावित आहे. हया तलावांच्या पुनरूज्जीवनासाठी मास्टर प्लान व विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडे सरोवरे संवर्धनासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यापैकी सोनेगाव व गांधीसागर या तलावांच्या पुनरूज्जीवनासाठी मान्यता प्राप्त असून अनुक्रमे रू 3.25 कोटी व रू 1.79 कोटी खर्चाचे काम प्रगतीपथावर आहे.

- **नद्यांचे पुनरूज्जीवीकरण प्रकल्प**

नागपूर शहर हे भारतातील 13 वे मोठे शहर आहे. शहरातून नाग नदी, पिवळी नदी, व पोरा नदी हया वाहतात. या नद्यांमध्ये नाल्याचे पाणी व कचरा ज्यात सॉलीड वेस्ट चा अंतर्भाव आहे. त्यामुळे या नद्या सर्वत्र दुषीत झाल्या असून पुनरूज्जीवनासाठी सर्व नद्यांचा मास्टर प्लान बनविण्यात आला आहे. हा विस्तृत प्रकल्प अहवाल रू 126.00 कोटी राज्य शासनास सादर करण्यात आला आहे. राज्य शासनाने सदर प्रस्तावास संमती देवून हा अहवाल केंद्र शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाची केंद्र शासन स्तरावर पडताळणी सुरू आहे. या प्रस्तावास लवकरच मान्यता अपेक्षित आहे.

या वित्तीय वर्षात नागपूर शहरातील नागनदी लोकसहभागाने पुनर्जिवीत करण्याचा प्रकल्प मा. महापौर यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. या उपक्रमाची दखल घेवून महानगरपालिकेस Scotch या संस्थेमार्फत गौरविण्यात आलेले आहे.

- **मलनिःस्सारण केन्द्राचे निर्माण**

भांडेवाडी येथील 80 द. ल. लि. मलनिःस्सारण केन्द्राचे नुतनीकरण करुन त्याची क्षमता 200 द.ल.लि. पर्यंत वाढविण्याचा प्रकल्प Deferred Payment on Annuity Basis वर तयार केला असून प्रस्तावाला महासभेची मंजूरी प्राप्त आहे. राज्य शासनाने प्रकल्प मान्य केला आहे. याप्रकल्पामुळे नागनदी, कन्हान नदी, व वैनगंगानदीतील गोसेखुर्द प्रकल्पातील पाण्याचे प्रदुषण होण्यास आळा बसेल. पर्यावरणाचे रक्षण व भविष्यात प्रक्रिया केलेले पाणी विकल्या गेल्यास मनपाला आर्थिक उत्पन्नाचा एक स्त्रोतही उपलब्ध होईल.

- **उत्तर सिवरेज झोन**

सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापनासाठी उत्तर सिवरेज झोनचा विस्तृत प्रकल्प राशी रू 493.56 कोटी तयार करून महाराष्ट्र शासना मार्फत केन्द्रशासनास जे एन एन यु आर एम अंतर्गत सादर करण्यात आले आहे. यास मान्यता मिळाल्यास निविदा प्रक्रिया पूर्ण करून सदर प्रकल्प त्वरीत सुरू करण्याचा माझा मानस आहे.

- **लघु मलनिःस्सारण केन्द्र**

मनपाव्दारे 4 ठिकाणी द.ल.लि. क्षमतेचे लघु मलनिःसारण केन्द्र बांधण्याचे प्रस्तावित केले होते. यापैकी मोक्षधाम व मानकापूर लघु मलनिःसारण केंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. या वर्षात रु. 2.50 कोटी खर्च झालेला आहे. उर्वरित 2 ठिकाणचे लघु मलनिःसारण केन्द्राचे काम सुरू करण्याचा माझा मानस आहे.

सांडपाण्याचे योग्य प्रक्रिया करून उद्यान विकासासाठी वापर, बांधकामासाठी वापर करण्यात येईल त्यामुळे पेयजलाची बचत व उत्पन्न या दोन्ही बाबी साधल्या जावून जलप्रदुषणाचे नियंत्रण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न महानगरपालिकेव्दारे करण्यात येत आहे.

- **कविवर्य स्व. सुरेश भट सभागृह**

सदर सभागृहाचे कामावर रू 14 कोटी खर्च झाले आहे. उर्वरित काम प्रगतीपथावार आहे. हे काम मार्च 2015 पर्यंत पूर्ण करण्याचा माझा मानस आहे. या सभागृहाची प्रेक्षक क्षमता 2000 इतकी राहील.

- **शहरातील प्रकाश व्यवस्थेत सुधारणा**

शहरात अस्तित्वात असलेले 26,712 पथदिवे ऊर्जा कार्यक्षम पथ दिव्यांनी बदलवून उर्जाबचत करण्याचे काम या वर्षात सुरू करीत आहे. हयातून किमान 30 टक्के उर्जा बचत अपेक्षित आहे.

- **वाहतुकीस अडथळा असणारे खांब हटविणे**

शहरातील रस्त्यांमध्ये वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे विद्युत खांब व इतर संलग्न साहित्य हटविण्यासाठी रू 50 कोटी रकमेची कामे हाती घेतली आहेत. आतापर्यंत रू 34 कोटी रकमेची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येईल. यासाठी प्रस्तावित अर्थसंकल्पात रू 25 कोटीचीं तरतुद केली आहे.

- **नागपूर शहर मॉडेल सोलर सिटी रूपाने विकसीत करणे**

अपांरपारिक ऊर्जेचा योग्य विनियोग व्हावा म्हणून "मॉडेल सोलर सिटी " ही संकल्पना राबवावयाची आहे. केंद्र शासनाच्या अपारंपारिक ऊर्जा विभागाकडून महानगरपालिकेस समरूप निधी प्राप्त व्हावा असे प्रयत्न सुरू होते. आता मनपाच्या इंदिरा गांधी, पाचपावली, आयसोलेशन रूग्णालयात सोलर वॉटर हिटर लावणे, मुख्यालयात, झोन क्रमांक 5, 8, व 9 मध्ये सोलर फोटो, वोल्टाईफ पावर पॅक लावणे तसेच सामान्य नागरिकांच्या घरी 3450 सोलर वॉटर हीटर लावण्यासाठी मंजूरी प्राप्त झाली. या कामाची व्याप्ती वाढविणे व अपांरपारिक उर्जेचा योग्य वापर करून घेण्याच्या दृष्टीने भांडेवाडी सिवरेज ट्रिटमेंट प्लान्ट मध्ये निर्माण होणाऱ्या मिथेन वायू पासून ऊर्जा निर्मिती प्रकल्प हाती घेण्याचा व हया प्रकल्पास सन 2014–2015 मध्ये दृष्य स्वरूप देण्याचा माझा प्रयत्न आहे.

- **शहर वाहतूक व्यवस्था**

नागपूर शहर वाढत्या नागरिकरणाबरोबरच स्वंयचलीत वाहनांच्या संख्येत मोठया प्रमाणा वाढ होत असल्याने शहरातील वाहतूक सुरळीत, अपघात विरहीत राहण्यासाठी वाहतूक सिग्नलचे Led Base with Battery backup & timer लावून Upgradation करण्यास व ट्रॅफिक कंट्रोल सिस्टीम उभारणे, ओव्हर हेड साईनेज सिस्टम, पार्किंग व्यवस्था सुधारीत करणे, चौरस्ते सुधारणा, रस्ते दुभाजक तयार करणे, रोड मार्किंग इ. कामे हाती घेण्यात येत आहे. त्याकरीता सन 2014–2015 चे प्रस्तावित अर्थसंकल्पात रू 1.91 कोटी ची तरतुद केलेली आहे.

- **जमीन अधिग्रहण**

नागपूर शहराचा विकास आराखडयातील नियोजित आरक्षणे विकसित करण्यासाठी पावले उचलण्यात येत आहे. टिडीआर माध्यमातून काही आरक्षणाखालील जमिन मनपा ने विनामुल्य अधिग्रहीत केल्या आहेत. परंतू काही जमीन धारक टिडीआर च्या मोबदल्यात जमीन हस्तांतरीत करण्यास तयार नाहीत. त्यामुळे विहीत जमिन अधिग्रहित करणे मनपा ला क्रम प्राप्त आहे. अन्यथा अशा जमिनी आरक्षणामधून वगळल्या जातील. यासाठी भूमी अधिग्रहण कायद्या अंतर्गत पैशाच्या स्वरूपात मोबदला देण्याची कार्यवाही करावी लागेल. जमीन अधिग्रहणासाठी मोठा निधी महानगरपालिकेला लागणार आहे.

- **शहरातील जुन्या पुलांचे व इमारतीचे सक्षमीकरण करण्यासाठी डिझाईन आणि सर्व्हे युनिटची स्थापना**

नागपूर शहरातील बरेचशे पुल जुने असून त्यापैकी काही पुल ब्रिटीश कालीन आहेत. या पुलांचे निर्धारीत आर्युमान संपुष्टात आले असून सदर पुलांचे बळकटीकरण करणे, आढावा घेणे व त्यासाठी निश्चित व नियोजीत कार्यक्रम ठरविणे त्याचप्रमाणे नागपूर शहरातील जुन्या इमारती जीर्ण झालेल्या आहेत व ज्यांचे अस्तित्व धोकादायक ठरून मनुष्य व वित्त हानी मोठया प्रमाणात होऊ शकते अश्या इमारतींचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत अभ्यास करून अशा अहवाला प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. हयासाठी तांत्रिक सल्लागार नियुक्त करणे योग्य राहणार नाही कारण ही नियमित व निरंतर चालणारी प्रक्रीया आहे. याबाबत एमएमसी ॲक्ट नुसार कार्यवाही करण्याच्या शक्ति मनपा मध्ये निहीत असल्याने व शासनानेही इमारतीच्या बांधकामाचे परीनिरीक्षण (Structural Audit) करण्याच्या सुचना दिल्याने यासाठी एक स्वतंत्र कक्ष नागपूर मनपाचे अधिक्षक अभियंता यांचे अधिनस्त स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. हा कक्ष उपरोक्त सर्व बाबींची तपासणी करेल. या कक्षाने केलेल्या सुचना नुसार कामाची अंमलबजावणी करण्यात येईल ही व्यवस्था तातडीने अस्तित्वात आणण्याचा माझा प्रयत्न राहील.

पाणी पुरवठा, सांडपाणी, घनकचरा प्रक्रिया, रस्ते, ROB, RUB तसेच प्रकाश व्यवस्था व इतर मुलभूत सोयी पुरविण्यासाठी विविध क्षेत्रांमध्ये काम करतांना मनपात सर्वेक्षण व संकल्प चित्र विभाग नसल्याने सातत्याने प्रकल्प सल्लागारांवर (Consultant) अवलंबून रहावे लागते. प्रकल्प सल्लागारांच्याही काही मर्यादा असतात व त्यांनाही इतर तज्ञ तसेच सेवानिवृत्त झालेल्या तज्ञांवर अवलंबून राहावे लागते. मागील सात ते आठ वर्षांमध्ये सल्लागारांवर मनपाने रू 20 ते 25 कोटी खर्च केला आहे.

हया परिस्थीतीत मनपात " सर्वेक्षण व संकल्पचित्र विभाग " असावा अशी माझी संकल्पना आहे. हया विभागाव्दारे तातडीचे सर्वेक्षण इन्स्पेक्शन्स डिझाईन्स इ. करणे शक्य होईल. हा विभाग स्थापन करण्यासाठी मी सन 2014—2015 या वित्तीय वर्षात आवश्यक प्रक्रीया पार पाडीत आहे.

## आरोग्य सुविधा पुरविणे

- **डायलीसीस सुविधा**

शहरातील गरीब व गरजू रूग्णांना माफक दरात डायलेसीस सुविधा मनपाच्या स्व. प्रभाकरराव दटके, महाल, रोग निदान केंद्रामध्ये माहे जानेवारी 2012 पासून सुरू

करण्यात आली आहे हा प्रकल्प सन 2014–2015 या आर्थिक वर्षातही राबविण्यात येणार आहे.

- **ॲन्टी रेबिज व्हॅक्सीन**

श्वानदंश रूग्णांना मोफत ARV लस मनपाच्या सर्व सहाही दवाखान्यातून उपलब्ध करून देण्यात येईल. यासाठी सन 2014–2015 च्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतुद करण्यात आली आहे.

- **रक्त पेढी (Blood Bank)**

सिकलसेल व थॅलेसिमीया रूग्णांना मोफत रक्त पुरवठा व इतर रूग्णांना स्वस्त दरात मनपातर्फे रक्त पुरवठा करण्यात येईल.

- **सिकलसेल**

हा एक अनुवंशिक आजार असून या आजाराचे 10 हजार पेक्षा जास्त रूग्ण शहरात आहे. या रूग्णांकरीता सिकलसेल युनिट पाचपावली सुतिकागृह येथे सुरू केले आहे. मनपा तर्फे सिकलसेल रूग्णांना मोफत औषधोपचार व रक्त तपासणी करण्यात येत आहे.

- **जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (J.S.S.K.)**

पाचपावली सुतिकागृह व इंदिरा गांधी रूग्णालय येथे सुरू असून. गर्भवती महिला व नवजात बालकांना संपूर्ण उपचार मोफत देण्यात येतील. राज्य सरकारच्या आरोग्य विभागातर्फे मुलगी वाचवा अभियानाअंतर्गत बेस्ट सीटी फॉर हेल्थ केअर सर्वीस पुरस्कार मनपास सन 2013 ला प्राप्त झाला आहे.

- **दंत चिकित्सा केंद्र**

मनपा मार्फत इंदिरा गांधी रूग्णालय, सदर व महाल रोग निदान केंद्र येथे पीपीपी तत्वावर डेंटल क्लिनिक उघडण्यासाठी पूर्ण मशिनरी व व्यवस्थापन खाजगी संस्थेचे राहणार असून मनपाने ठरवून दिलेल्या दरामध्ये उपचार करण्यात येईल.

- **नेत्र विभाग**

महाल रोग निदान केंद्र येथे पीपीपी तत्वावर नेत्र विभाग सुरू करण्याकरीता दोन वार्डाचे निर्माण कार्य सुरू आहे. शासनाची मंजूरी प्राप्त होताच नेत्र विभाग सुरू करण्यात येईल तज्ञ डॉक्टरांच्या अभिरूची प्रकटनाचे व्दारे नेमणूकीची कार्यवाही सुरू आहे.

- ## आरोग्य शिबिरे

मनपा कार्यक्षेत्रात सफाई मजदूर, ठिय्यावरील मजदूर, यासाठी आरोग्य शिबिरे, मुस्लिम समाजातील लहान मुलांकरीता सुन्ता शिबिरे, ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी शिबिरे, अनाथालयातील मुलांची तपासणी साठी आवश्यक कार्यवाही, औषधे, फळे व प्रोटीन पावडर वाटप, पॅथॉलॉजीकल, हिमोग्लोबीन, रक्त शर्करा इत्यादी चाचण्या मनपा मोफत व औषध खर्चासहीत करणार आहे यासाठी रू 10 लक्ष तरतुद सन 2014–2015 अर्थसंकल्पात करण्यात येत आहे.

- ## अग्निशामक व आणीबाणी विभाग

नागपूर शहराचा विस्तार मोठया प्रमाणावर होत असून गगनचुंबी इमारती अस्तित्वात आल्या आहेत. त्यामुळे आपातकालीन स्थिती निर्माण होण्याची शक्यता वाढली असून दुर्घटनांचे प्रमाण देखील वाढले आहे. अग्निशमन व आणिबाणी विभाग अधिक समर्थ व सक्षमपणे कार्यरत रहावा म्हणून आधुनिक पध्दतीची यंत्र सामुग्री हया विभागास उपलब्ध करून देण्याचा माझा मानस आहे.

हयासाठी हॅड्रॉलिक, रेस्क्यू टुल्स, थर्मल इमेज कॅमेरा, हाय प्रेशर लिफ्टींग बॅग, यंत्र सामुग्री वाहून नेण्यासाठी दोन पिकअप व्हॅन विविध प्रकारचे ऍन्सीलरी इक्वीपमेंट ची खरेदी करण्यात आली आहे हा विभाग अधिक तांत्रिक दृष्टया सक्षम करण्यासाठी दोन आधुनिक रेस्क्यू टेंडर, अग्निक कर्मचाऱ्यांना फायर सुट, मडपंप, रेस्क्यू टुल्स, व्हीक्टीम लोकेशन कॅमेरा, बी ए सेट, इत्यादी साहित्य खरेदी करण्याचा मानस आहे. उंच ठिकाणी अग्निशमनास समर्थता प्रदान करण्यास कमीत कमी 42 मीटर टीटीएल व 32 मीटर हॅड्रॉलिक प्लॅटफॉर्मला अग्निशमन सेवेत सामिल करून घेण्याचा माझा मानस आहे.

- ## शिक्षण विभाग

सन 2014–2015 च्या प्रस्तावित आर्थिक वर्षात गुणवत्ता वाढी साठी सद्यः स्थितीत सुरू असलेल्या प्रकल्पासोबत खालील प्रमाणे उपक्रम राबविण्याचा माझा मानस आहे.

- ## ॲबेकस योजना

महानगरपालिका शाळेतील पाचवी ते आठवी च्या विद्यार्थ्यां करीता व्यापक प्रमाणात ॲबेकस योजना प्रस्तावित आहे.

- **मिशन परिवर्तन प्रकल्प**

या प्रकल्पा अतर्गंत मनपाच्या शाळेमध्ये विद्यार्थी 80 पर्यंत पाढे म्हणत आहे. हा प्रकल्प सन 2013–2014 पासून सुरू करण्यात आला आहे. सन 2014–2015 मध्ये दुसरा टप्पा म्हणून इंग्रजी संभाषण, वक्तृत्व कला या क्षमता विकसीत करून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकास करण्याचा मानस आहे. याबाबत माझ्या मनपातील शिक्षकांनी हा प्रकल्प राबविण्यासाठी दिलेले योगदान कौतुकास्पद असून भविष्यात देखील योजनेच्या यशस्वीतेसाठी पूर्ण क्षमतेने कामे करतील अशी अपेक्षा करतो.

- **क्रिडा धोरण व क्रिडा कार्यक्रम**

नागपूर महानगरपालिका शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षात अंतर्गत शहराचा वाढता व्याप व विस्तार लक्षात घेता येथील नागरिकांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरीता खेळ व क्रिडा स्पर्धांचे विविध राष्ट्रीय स्तरावर आयोजन करून विशेष महत्व देण्यात आले आहे. नविन उदयोन्मुख खेळाडुंना प्रोत्साहन देणे त्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे व क्रिडा विकास करण्याचे दृष्टीने विविध क्रिडा विषयक तसेच नागरिकांकरीता विविध सांस्कृतिक कार्यक्रम (नागपूर महोत्सव) हाती घेण्यात येणार आहे. याकरीता क्रिडा विषयक विकास कार्यक्रम सन 2014–2015 चा प्रस्तावित अर्थसंकल्पात विविध व्यय पदामध्ये एकूण रू 0.77 कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

- **बॅ.शेषराव वानखेडे जन्म शताब्दी वर्ष कार्यक्रम**

नागपूर महानगरपालिका या वर्षी शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाचे आयोजन करीत आहे. हा एक सुखद संयोग आहे की नागपूर महानगरपालिकेचे प्रथम महापौर बॅ. शेषराव कृष्णराव वानखेडे यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. हे वर्ष "बॅ. शेषराव वानखेडे जन्म शताब्दी वर्ष" म्हणून समारंभपूर्वक आयोजन करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

## झोन अंतर्गत अंदाजपत्रकीय तरतुदीचे विकेंद्रीकरण

नागपूर महानगरपालिकेच्या झोनल स्तरावरील विविध विकास कामे व मूलभूत सुविधा पुरविण्याचे दृष्टीने प्रभाग समितीची स्थापना करण्यात आली आहे. मनपा चे सन 2014–2015 चे प्रस्तावित अंदाजपत्रकात प्रत्येक झोन अंतर्गत विकास कामा करीता तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

- **झोनल कार्यालयाची पुर्नबांधणी**

पुढील आर्थिक वर्षात महानगरपालिकेमार्फत धरमपेठ व हनुमान नगर झोन कार्यालयाची पुर्नबांधणी (Renovation Of Zonal Office) करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरीता सन 2014–2015 चे अर्थसंकल्पात रू 50 लक्षची तरतुद करण्यात आली आहे.

- **पी बजेट (आर्थिक दृष्टया मागास घटकांसाठी आवश्यक विकास कामाकरीता)**

सन 2011 च्या जनगणनेनुसार नागपूर शहराची लोकसंख्या 24,05,421 विचारात घेता हया लोकसंख्येच्या 39.40 टक्के म्हणजेच 424 आर्थिक दृष्टया मागास वसाहतीतील लोकसंख्या 9,47,736 आहे. नागपूर महानगरपालिकेमार्फत सन 2014–2015 मध्ये आर्थिक दृष्टया मागास घटकांकरीता रस्ते, पाणी पुरवठा, शिक्षण, स्वच्छतेच्या सोयी, प्रकाश व्यवस्था, शौचालये निर्माण, उद्याने, इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या करीता सन 2014–2015 चे प्रस्तावित अंर्थसंकल्पात" पी बजेट" अंतर्गत अंदाजे रू 107.23 कोटीची तरतुद केलेली आहे.

- **जेंडर बजेट (जी बजेट)**

शासनाचे निर्देशानुसार महानगरपालिकेला "जी बजेट" (जेंडर बजेट) अंतर्गत महिलांकरीता सोयी सुविधा पुरविण्याकरीता आवश्यक तरतुद करावयाची आहे. हया जेंडर बजेट अंतर्गत महिलांना स्वतःचे पायावर उभे राहण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण, आरोग्य, शिबिराचे आयोजन, महिलांकरीता प्रसाधन गृहाचे निर्माण, महिलांची नेत्र तपासणी, महिलांकरीता कल्याणकारी योजना व माता बाल संगोपन केंद्र, महिलांकरीता प्रशिक्षण, सहली व मुलांना प्रोत्साहनात्मक बक्षिस देणे इत्यादी योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. प्रस्तावित अर्थसंकल्पात एकूण रू 1.08 कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

- **मनपा मार्फत विविध निधीचे निर्माण**

नागपूर महानगरपालिकेमार्फत शहर विकास निधी, जल मल निधी, आग सुरक्षा निधी, शहरी वाहतूक निधी, इ. निधी निर्माण करण्यात आलेले आहे.

- **महिला व बालकल्याण**

नागपूर महानगरपालिकेला शासनाचे धोरणानुसार महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजना राबविण्याच्या दृष्टीने महिला व बालकल्याण समिती गठित

करण्यात आली आहे. त्या समितीचे शिफारशीनुसार कामे घेण्याकरीता मनपाचे सन 2014–2015 चे प्रस्तावित अर्थसंकल्पात रू 1.00 कोटी तरतुद करण्यात आली आहे.

- **मागासवर्गीय वस्तीतील नागरी मुलभूत सोयी**

नागपूर शहरातील मागासवर्गीय वस्तीतील नागरिकांना नागरी मुलभूत सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने सन 2014–2015 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात विविध कामांकरीता आवश्यक प्रमाणात तरतुद ठेवण्यात आली आहे.

- **स्वच्छता मोहिम**

नागपूर शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचे दृष्टीने महानगरपालिके मार्फत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

नागपूर शहरात अंदाजे 2000 किमी पेक्षा जास्त लांबीच्या भूमिगत मलवाहिन्या आहेत. अनेक मलवाहिन्या 50 वर्ष जुन्या आहेत. त्यामध्ये वारंवार अवरोध निर्माण होवून मलवाहिन्या तुंबण्याचे प्रकार सतत वाढत आहेत. या भूमिगत मलवाहिन्या व त्यांचे निरिक्षण, खोल असल्यामुळे मनुष्यबळाव्दारे त्यातील गाळ रेती कचरा इत्यादी काढणे फार जोखीम युक्त आहे. मनपाने अश्या धोकादायक कामाचे यांत्रीकीकरण करण्यास सुरूवात केली आहे. सध्या मलवाहिन्या व टाक्यामधील गाळ, कचरा, व इत्यादी काढण्यासाठी दोन मोठे व तीन लहान संच भाडेतत्वावर लावण्यात आले आहे. या धोकादायक कामाचे 100% यात्रिंकीकरण करण्याचे प्रयत्न आहेत.

नागपूर शहरात विविध झोन मधून 250 नाले वाहतात. या नाल्यांच्या साफ सफाईसाठी एक मोठे एस्केव्हेटर (पोकलेन) घेण्यात आले आहे. या मशीन व्दारे वर्षभर नाल्यांची सफाई करण्यात येईल.

- **उद्यान विकास कार्यक्रम**

नागपूर सुधार प्रन्यास कडून हस्तांतरीत 29 उद्याने, सौंदर्य स्थळे, व प्रमुख रस्त्यावरील रस्ता दुभाजकावर विकसीत केलेले सौंदर्यीकरण महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आले आहे. हस्तांतरीत झालेल्या या उद्यानांच्या विकासाकरीता तसेच महानगरपालिकेच्या 78 उद्यानांची आवश्यक दुरूस्ती व विकास कामांकरीता तसेच 6 उद्यांनाच्या नविनीकरणाची सुरू असलेली कामे सन 2014–2015 मध्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

महानगरपालिकेचे तसेच नागपूर सुधार प्रन्यास कडून हस्तांतरीत झालेल्या रस्ता दुभाजकावर विकसित केलेल्या सौदर्यीकरणाची देखभाल करण्याकरीता बरेच रस्ते दुभाजक प्रायोजकांना देण्यात आले आहेत. उर्वरित रस्ते दुभाजक देखभालीकरीता इतर प्रायोजकांना देण्याचे प्रयत्न सुरू आहे. मला आनंद आहे की क्रेडाई या संस्थेने वेगवेगळे रस्ता दुभाजक सौंदर्यीकरण करण्याची तयारी दर्शवीली आहे.

शहरातील बगीचे व उद्याने यांच्या विकासामुळे शहराच्या सौंदर्यीकरणामध्ये वाढ होत असल्यामुळे महानगरपालिकेमार्फत उद्यान विकास, सुधारणा इ बाबत धोरण राबविण्यात येत आहे. या धोरणा अंतर्गत शतकोटी वृक्ष लागवड कार्यक्रमा अंतर्गत वृक्ष लागवड व संवर्धन, 16 उद्यानांची विकास कामे सुरू असून उर्वरित 17 उद्यानांची विकास कामे लवकरच हाती घेण्यात येणार आहे.

सन 2013 च्या एबीपी न्युजचा ग्रिन सीटी पुरस्काराव्दारे मनपास गौरविण्यात आले आहे.

- **नागरी घनकचरा व्यवस्थापन**

आरोग्य विभाग (स्वच्छता) हा नागपूर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या व कामाच्या दृष्टीने सर्वात मोठा विभाग आहे. त्यामध्ये घन कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण, साठा, वाहतुक, प्रक्रीया व विल्हेवाट, तसेच जैव–वैद्यकीय कचऱ्याचे व्यवस्थापन व मनपा अंतर्गत क्षेत्राची 365 दिवस स्वच्छता ठेवणे या प्रमुख कामांचा समावेश आहे.

नागपूर शहराची लोकसंख्या अंदाजे 25 लक्ष आहे. शहरात दररोज सरासरी 900 टन कचरा निर्माण होतो. शहरातील कचरा उचलण्याकरिता ‘कचरा घर मुक्त शहर’ योजना (Bin Free City) सन 2008 पासुन सुरु करण्यात आली आहे. योजने अंतर्गत फक्त व्यापारिक व बाजार क्षेत्रात ज्या ठिकाणी कचरा सतत निर्माण होतो त्याच ठिकाणी कचरा घरे (Container) ठेवण्यात आली आहेत. रहीवाशी क्षेत्रातील अनेक कचरा घरे बंद करण्यात आली आहे. सध्या शहरातील कचरा घरांची संख्या 170 असुन त्यापैकी अंदाजे 100 कचरा घरे ही व्यापारिक क्षेत्रातील आहे. योजना सुरु करण्यापूर्वी शहरात कचरा घरांची संख्या अंदाजे 700 होती.

घराघरातुन कचरा गोळा करण्यासाठी व शहरातील सर्व कचरा उचलून नेण्यासाठी खाजगी कंत्राटदार नेमण्यात आला आहे. कंत्राटदाराकडे घराघरातुन कचरा गोळा करण्यासाठी लहान व मध्यम स्वयंचलीत वाहने, घंटागाडी, सायकल रिक्शा इत्यादी उपलब्ध आहे. त्यामार्फत कचराकुंडी मुक्त प्रकल्प राबविण्यात येत आहे.

शहरातील रस्त्यांची, सार्वजनिक स्थळांची साफसफाईच्या दृष्टीने शहरात अंदाजे 4700 कि.मी. रस्ते असुन त्यांच्या साफसफाईची जबाबदारी मनपावर आहे. मनपा ही जबाबदारी समर्थपणे पार पाडीत आहे.

- **घनकचऱ्याची विल्हेवाट व प्रक्रीया**

नागपूर महानगरपालिकेने कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने (MSW Rules **2000** प्रमाणे) करण्याकरिता बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर 12 वर्षाकरिता कंत्राट मे.हॅन्जर बायोटेक एनर्जिज प्रायवेट लिमिटेड, मुंबई यांना दिले आहे.

भांडेवाडी डंपीग यार्ड मध्ये अस्ताव्यस्त पडलेला कचरा एका ठिकाणी जमा करण्यात आला असून शास्त्रोक्त पध्दतीने जमिनीचा भरणा करुन बंद करण्यात आला. बंद केलेल्या भागावर हिरवळ लावण्यात आली आहे. सध्या कचऱ्यापासून खत निर्मीती, हिरवा कोळसा, विट व वाळू वर प्रक्रीया करुन दररोज अंदाजे 600 मेट्रीक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येते. संपूर्ण कचऱ्यावर शास्त्रोक्त रित्या प्रक्रीया करुन विल्हेवाट लावण्याचे काम जानेवारी 2011 पासुन सुरु करण्यात आले. तसेच अनुपयोगी (Inert) कचऱ्याचा भरणा कचरा भराव क्षेत्र (Sanitary Land fill) मध्ये करण्यात येणार असून त्याबाबतचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

- **जैव व वैद्यकिय कचऱ्याचे व्यवस्थापन**

शहरामध्ये 650 रुग्णालये, दवाखाने, सुतिकागृहे इत्यादी पंजीकृत असून तेथे घातक व टाकाऊ कचरा अंदाजे 15 टन प्रतिदिवस निर्माण होतो. म.न.पा. ने भांडेवाडी येथे भस्मीकरण भट्टी तयार करुन जैव वैद्यकिय कचऱ्याची (बॉयोमेडीकल वेस्ट) विल्हेवाट लावण्याचे कंत्राट सुपर हायजेनीक या संस्थेला बीओटी तत्वावर दिले आहे.

- **पर्यावरणाचा समतोल व नैसर्गीक संपत्तीचे जतन**

दहनघाटावर स्वतंत्र बायोगॅस यंत्रणा उभारून निर्माण होणारा बायोगॅस लाकडासमवेत शवदहनाकरीता वापरण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे लाकडांच्या वापरात 50 टक्के बचत होवून नैसर्गीक संपत्तीचे जतन होईलच शिवाय पर्यावरणाचा समतोल राखण्यास सुध्दा मदत होईल.

- **NATIONAL ZOONOSIS INSITITUTE**

मनुष्याला प्राण्यांपासून अनेक प्रकारच्या रोगांचा संसर्ग होवू शकतो. संपूर्ण भारत देशात अशा प्रकारच्या रोगावर संशोधन करून प्रतिबंधात्मक उपाय व उपचार

शोधण्यासाठी सोय उपलब्ध नाही. नागपूर महानगरपालिकेने पुढाकार घेवून नागपूर शहरात राष्ट्रीय झोनोसीस संस्था स्थापन करण्यास्तव पाऊल उचलेले आहे. जागतिक आरोग्य संघटना (WHO) तथा केंद्र शासनाच्या (ICMR & ICAR) मदतीने सदर संस्था उभारण्याचा मानस आहे.

- **पशुशाळा (Cattle Shed) तयार करणे**

नागपूर शहरात दुधाचा व्यवसाय करणाऱ्यांसाठी शहराच्या हद्दीजवळ जागा उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. गायी, म्हशी इत्यादी मुळे रहीवाशी क्षेत्रात अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होवून सामान्य नागरिकांना अस्वछता व रोगराईचा सामना करावा लागतो. शहरातील रस्त्यांवर फिरणाऱ्या मोकाट जनावरांमुळे अनेक प्रकारचे अपघात होवून प्राणहानी सुध्दा झाली आहे. या सर्व अडचणींवर मात करण्याच्या दृष्टीने शहरातील सर्व गायी, म्हशी इत्यादी करीता जागा उपलब्ध करून आवश्यक त्या सोयी उभारण्याचे प्रस्तावित आहे.

नागपूर शहर हे महाराष्ट्राची उपराजधानी असून बुटीबोरी ही पंचतारांकित औद्योगिक वसाहत, नव्याने येत असलेला मिहान/गजराज हे कार्गो प्रकल्प, त्यामुळे शहराची होणारी भरीव वाढ, (घनता व क्षेत्रफळ) विदर्भातील कृषी प्रधानता व त्या अनुषंगाने नागपूरला उपलब्ध असलेली मोठी बाजारपेठ, व्यापारी संकुले व नजिकचे सर्व भारतास जोडणारे महत्वाचे केंद्र हयामुळे नागपूर शहर दिवसेंदिवस विकसीत व विस्तारीत होत आहे. त्यामुळे "मेट्रोरीजनचा विकास" ही संकल्पना वास्तवात यावयास सुरूवात झाली आहे.

मनपा जागेच्या वापराबाबत परिणामकारक नियोजन, पाणीपुरवठयाचे सक्षम Network (जाळे), मलनिस्सारण प्रकल्प मनोरंजनाच्या दृष्टीने शहरात विविध ठिकाणी मनोरंजन स्थळाचे निर्माण करणे, शहरातील जागा जलाशयांसाठी राखीव ठेवणे त्यांचे रक्षण व सौंदर्यीकरण करणे, शहरातील वाहतूक सोयी सुविधा मध्ये सुधारणा करणे, मनपाच्या सेवा पुरवण्यासाठी अत्याधुनिक तंत्राचा अवलंब करणे, ई–गर्व्हनन्स, पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन या सर्व बाबींना येणाऱ्या वर्षात प्राधान्य देण्यात येईल. नागपूरला Most Livable and Lovable City बनविण्याचे दृष्टीने आपण प्रयत्नशिल असले पाहीजे.

पर्यायाने नागपूर शहर विकासाची पूर्ण जबाबदारी असलेली संस्था म्हणून महापालिकेचे महत्त्व अधिक आहे. जबाबदारीत सुध्दा बऱ्याच प्रमाणात वाढ झाली आहे व होत आहे. मात्र हे होत असतांना उत्पन्नाची साधने/वसुली/नवीन कराधान यात पुरेशी वाढ होत नाही पर्यायाने या सर्व बाबींचा महानगरपालिकेवर ताण येतो व त्यामुळे

शहराच्या यथायोग्य विकासावर काही अंशी विपरीत परीणाम होण्याचीही शक्यता असते. राज्य शासनाच्या दिनांक 20/2/2013 च्या अधिसुचनेनुसार जकात कराची व्यवस्था संपुष्टात आणून त्याऐवजी नागपूर मनपा क्षेत्रात एलबीटी लागू करण्यात आला आहे. जुनी प्रस्थापित झालेली व्यवस्था बदलल्या नंतर नविन येणारी पध्दती दृढमुल होण्यासाठी काही कालावधी लागतो. हा संक्रमणाचा कालावधी अत्यंत कठिण असून नविन कर पध्द्तीचे बळकटीकरण होई पर्यंत महानगरपालिकेच्या वित्तीय स्थितीवर परिणाम करणारा आहे. महानगरपालिकेचे उत्पन्नात याच कारणाने काही प्रमाणात घट झाली असून आता अंदाजपत्रक सुधारीत करतांना अपेक्षित उत्पन्न, आतापर्यंत प्राप्त झालेले उत्पन्न, उर्वरित कालावधीत अपेक्षित असणारे उत्पन्न याचा योग्य तो ताळमेळ घेतला आहे. सन 2014–2015 या प्रस्तावित वर्षात मनपास मिळणारा महसुल याचे अत्यंत वास्तववादी अशा स्वरूपाचे विवेचन करतांना फुगीर व अवास्तव स्वरूपाचे दायीत्व महानगरपालिकेवर निर्माण करणाऱ्या सर्व बाबी टाळल्या असून वास्तवाशी समायोजन साधणारा हा अर्थसंकल्प मी सादर करीत आहे.

अर्थसंकल्पातील निर्धारित केलेले उद्दिष्ट 100 टक्के पूर्ण व्हावे यासाठी मी व माझे अधिनस्त प्रशासन कटिबध्द आहे. या अर्थसंकल्पाव्दारे नमुद केलेल्या बाबीवरील खर्च हा परिपूर्ण मोबदला देणारा असावा व अर्थसंकल्पीय राशीचा विनियोग योग्य प्रकारे व्हावा ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. यासाठी मा. अध्यक्ष, स्थायी समिती व सर्व सन्माननीय सदस्य, नगरसेवक, यांना प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करतो. आपले सहकार्याची अपेक्षा करतो. व पुनःश्च एकदा आपले सहकार्य मिळेलच असा विश्वास व्यक्त करतो व माझ्या अर्थसंकल्पीय भाषणास विराम देतो.

धन्यवाद...........!

**श्याम वर्धने**
**आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

# नागपूर महानगरपालिका ने मागासवर्गीय वस्तीकरीता सन 2013&14 चे सुधारीत व सन 2014&15 चे प्रस्तावित अंदाजपत्रकात केलेली तरतूद

(रू. लाखात)

| अ. क्र. | नविन पद क्रमांक | व्यय शिर्ष मागासवर्गीयांच्या राखीव निधी | निगम आयुक्त व्दारा सुधारीत 2013—14 | निगम आयुक्त व्दारा प्रस्तावित 2014—15 |
|---|---|---|---|---|
| 1 | A27400121201 | मागासवर्गीय उमेदवारांना मुलाखतीस बोलाविण्याचा प्रवास खर्च | 0.50 | 0.50 |
| 2 | A27601340705 | झोपडपट्टी पुर्नवसन कार्यालय वेतन | 60.00 | 60.00 |
| 3 | A27601322005 | झोपडपट्टी पुर्नवसन कार्यालय संकीर्ण व्यय | 50.00 | 50.00 |
| 4 | A27701330805 | खांडकी व सिमेंट पेव्हींग दुरूस्ती | 15.00 | 15.00 |
| 5 | A27702020806 | प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पाठयपुस्तक वाटप | 15.00 | 15.00 |
| 6 | A27402020702 | मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गणवेष वाटप | 25.00 | 25.00 |
| 7 | A27702042406 | प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | 10.00 | 10.00 |
| 8 | A27702030803 | प्राथमिक शाळा इमारत दुरूस्ती(दुघ.) | 50.00 | 50.00 |
| 9 | A27702030804 | माध्यमिक शाळा इमारत दुरूस्ती(दु.घ) | 10.00 | 10.00 |
| 10 | A47201271305 | सफाई कामगारांना मालकी तत्वावर घर बांधणी करीता अनुदान | 5.00 | 5.00 |
| 11 | A47601260601 | BSUP योजने अंतर्गत घरकुल योजनेकरीता | 2550.00 | 4000.00 |

| अ. क्र. | नविन पद क्रमांक | व्यय शिर्ष मागासवर्गीयांच्या राखीव निधी | निगम आयुक्त व्दारा सुधारीत 2013–14 | निगम आयुक्त व्दारा प्रस्तावित 2014–15 |
|---|---|---|---|---|
| 12 | A47501770706 | मागासवर्गीय वस्तीत विद्युत खांब लावणे | 25.00 | 25.00 |
| 13 | A43801940702 | टॅकरव्दारे पाणी पुरवठा करणे (नागपूर इन्व्हॉरमेंटल सर्व्हीसेस लि. नागपूर यांना देण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून) 33% | 2640.00 | 2640.00 |
| | **एकूण महसुली खर्च** | | 5455.50 | 6905.50 |
| 14 | A47101171504 | वैद्यकीय केंद्र उभारणे व मशिनरी खरेदी (पाचपावली सुतीकागृह) व ब्लड स्टोरेज करीता | 10.00 | 10.00 |
| 15 | A47501371912 | भूमिगत नाली बांधणे | 40.00 | 40.00 |
| 16 | A47501272313 | स्वस्त प्रकारचे संडास निर्मीती | 50.00 | 50.00 |
| 17 | A47501374009 | गलिच्छ वस्ती सुधारणा अंतर्गत अतिरिक्त सवलती | 100.00 | 10.00 |
| 18 | A47501370511 | रस्त्याचे निर्माण | 500.00 | 500.00 |
| 19 | A46801673622 | उद्यान सुधारणा | 10.00 | 5.00 |
| 20 | A47502072714 | प्राथमिक शाळा भवन निर्माण (दु.घ.) | 35.00 | 35.00 |
| 21 | A47502072815 | माध्यमिक शाळा भवन निर्माण (दु.घ.) | 15.00 | 15.00 |
| | | **एकूण भांडवली खर्च** | **760.00** | **665.00** |
| | | **एकूण महसुली व भांडवली खर्च** | **6215.50** | **7570.50** |

# नागपूर महानगरपालिकेच्या सन 2014&15 चे प्रस्तावित अर्थसंकल्पात ठळक प्रकल्पाकरीता करण्यात आलेल्या तरतुदीचे विवरण

(रू लाखात)

| अ. क्र | व्यय पद कमांक | प्रकल्पाचे नाव | सन 2014—15 करीता करण्यात आलेली तरतुद |
|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** |
| 1 | A42001470511 | सिमेंट कॉक्रिंटचे रस्ते निर्माण | 2500.00 |
| 2 | **विविध व्यय पद** | शहरातील रस्ते सुधारणा कार्यक्रम | 2555.00 |
| 3 | A420014704614 | नवीन हॉट मिक्स प्लॅन्ट निर्माण | 500.00 |
| 4 | A42101370616 | मनिष नगर, पारडी व इतर पुलाचे बांधकामाकरीता | 500.00 |
| 5 | A43902371919 | लघु मलःनिस्सारण केंद्राचे निर्माण | 400.00 |
| 6 | A46801373623 | कविवर्य सुरेश भट साहित्य व कला अकादमी | 300.00 |
| 7 | **विविध व्यय पद** | शहरातील प्रकाश व्यवस्थेत सुधारणा | 1250.00 |
| 8 | A42301770723 | वाहतूकीस अडथळा करणारे विद्युत खांब हटविणे | 2500.00 |
| 9 | A42301770725 | नागपूर शहर ″मॉडेल सोलर सिटी ″रूपाने विकसित करणे | 950.00 |
| 10 | **विविध व्यय पद** | शहर वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करणे | 191.00 |
| 11 | **विविध व्यय पद** | आरोग्य विषयक सुविधा पुरविणे, (डायलिसीस सुविधा, रक्तपेढी, सिकल सेल, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, दंत चिकीत्सा, नेत्र विभाग इ.) | 299.00 |
| 12 | **विविध व्यय पद** | अग्निशामक व आणिबाणी विभाग विकास प्रकल्प | 987.00 |
| 13 | **विविध व्यय पद** | शिक्षण विभाग विकास प्रकल्प व नवीन (ॲबेकस योजना, मिशन परिवर्तन प्रकल्प ) उपक्रम राबविणे | 520.00 |
| 14 | A45802073009 | सेंट्रलाईज्ड इंटर ॲक्टीव्ह ऑनलाईन क्लासरूम प्रकल्प | 10.00 |

| अ. क्र | व्यय पद क्रमांक | प्रकल्पाचे नाव | सन 2014–15 करीता करण्यात आलेली तरतुद |
|---|---|---|---|
| 15 | **विविध व्यय पद** | क्रीडा धोरण व क्रीडा विकास कार्यक्रम | 77.00 |
| 16 | A42901371339 | धरमपेठ व हनुमान नगर झोन कार्यालयाची पुर्नबांधणी | 50.00 |
| 17 | **विविध व्यय पद** | पी बजेट– आर्थिकदृष्टया मागास घटकांकरीता आवश्यक तरतुद | 10722.14 |
| 18 | **विविध व्यय पद** | जेंडर बजेट–महिला करीता सोयी सुविधा– | 108.00 |
| 19 | A27002441601 | महिला व बालकल्याण | 100.00 |
| 20 | **विविध व्यय पद** | मागासवर्गीय वस्तीतील नागरी मूलभूत सोयी | 7570.50 |
| 21 | **विविध व्यय पद** | स्वच्छता मोहीम राबविणे | 382.00 |
| 22 | A44202371904 | नविन डम्पींग स्टेशन निर्माण करणे व जमीन अधिग्रहन करणे | 100.00 |
| 23 | **विविध व्यय पद** | उद्यान विकास कार्यक्रम | 311.00 |
| 24 | A40600870304 | भू–अर्जन मनपा चे सर्व प्रकल्पाकरीता | 300.00 |
| 25 | A47601260601 | BSUP योजने अंतर्गत घरकुल योजना | 4000.00 |
| 26 | A25002020705 | मनपाच्या शाळेतील वर्ग 1 ते 4 मधील विद्यार्थ्यांना गणवेश व स्वेटर वाटप करणे | 75.00 |
| 27 | A26502242211 | महापौर चषक, टुर्नामेंट व क्रीडारत्न पुरस्कार | 60.00 |
| 28 | A42901371340 | नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये सोयी सुविधा उपलब्ध करणे | 200.00 |
| 29 | A43902317915 | उत्तर व दक्षिण S.T.P. केंद्रासाठी मनपाचा सहभाग | 400.00 |
| 30 | A26502242214 | नागपूर महोत्सव व महानगरपालिकेचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव | 150.00 |
| 31 | A44501372305 | सुलभ शौचालय निर्मिती | 100.00 |

# नागपूर महानगरपालिका, नागपूर
# सन 2013&2014 ची सुधारीत आर्थिक परिस्थिती

(रूपये लाखात)

| | | |
|---|---|---|
| **1.4.2013 ची सुरूवातीची वास्तविक शिल्लक** | | 7159.43 |
| **आय** | | |
| सन 2013–2014 चे सुधारीत महसुली आय | 88789.95 | |
| सन 2013–2014 चे सुधारीत भांडवली आय | 2625.00 | |
| सन 2013–2014 चे निक्षेप ठेवी आय | 5601.00 | |
| सन 2013–2014 चे प्रस्तावित अग्रीम आय | 605.00 | |
| **एकूण सुधारीत आय** | | 97620.95 |
| **सुरूवातीची शिल्लक धरून एकूण सुधारीत आय** | | 104780.38 |
| **व्यय** | | |
| सन 2013–2014 चा सुधारीत महसुली व्यय | 58651.05 | |
| सन 2013–2014 चा सुधारीत भांडवली व्यय | 40308.00 | |
| सन 2013–2014 चा निक्षेप ठेवी व्यय | 5151.00 | |
| सन 2013–2014 चे सुधारीत अग्रीम व्यय | 660.00 | |
| **एकूण सुधारीत व्यय** | | 104770.05 |
| **31.3.2014 अखरेची अपेक्षित शिल्लक** | | 10.33 |

# नागपूर महानगरपालिका, नागपूर


## सन 2014&2015 ची प्रस्तावित आर्थिक परिस्थिती

(रूपये लाखात)

| | | |
|---|---|---|
| **1.4.2014 ची सुरूवातीची अपेक्षित शिल्लक** | | 10.33 |
| **आय** | | |
| सन 2014–2015 चे प्रस्तावित महसुली आय | 96943.74 | |
| सन 2014–2015 चे प्रस्तावित भांडवली आय | 2625.00 | |
| सन 2014–2015 चे निक्षेप ठेवी आय | 5967.00 | |
| सन 2014–2015 प्रस्तावित अग्रीम आय | 605.00 | |
| **एकूण प्रस्तावित आय** | | 106140.74 |
| **सुरूवातीची शिल्लक धरून एकूण प्रस्तावित आय** | | 106151.07 |

| | | |
|---|---|---|
| **व्यय** | | |
| सन 2014–2015 चा प्रस्तावित महसुली व्यय | 58431.25 | |
| सन 2014–2015 चा प्रस्तावित भांडवली व्यय | 41567.00 | |
| सन 2014–2015 चा निक्षेप ठेवी व्यय | 5487.00 | |
| सन 2014–2015 चा प्रस्तावित अग्रीम व्यय | 650.00 | |
| **एकूण प्रस्तावित व्यय** | | 106135.25 |
| **31.3.2015 अखरेची अपेक्षित शिल्लक** | | 15.82 |


# सन 2014&15 चा अपेक्षित उत्पन्नाचा आलेख
# रूपया असा येईल




**उत्पन्नाची बाजू (प्रतिशतमध्ये)**

| | |
|---|---|
| स्थानिक संस्था कर | 41.45 |
| मालमत्ता कर | 18.03 |
| मीटरनुसार पाणी दर | 11.78 |
| बाजार वसुली | 0.41 |
| सरकारी अनुदान (महसुली+भांडवली) | 9.25 |
| कर्ज | 0.00 |
| इतर आय (सर्व/करेत्तर) | 12.89 |
| निक्षेप ठेवी गुंतवणूकीसह | 5.62 |
| अग्रीम वसुली | 0.57 |


# सन 2014&15 चा अपेक्षित खर्चाचा आलेख
# रूपया असा जाईल




**खर्चाची बाजू (प्रतिशतमध्ये)**

| | |
|---|---|
| आस्थापना व्यय | 24.57 |
| सेवानिवृत्ती वेतन | 9.42 |
| प्रशासकीय व्यय | 2.55 |
| प्रवर्तन/सुस्थिती दुरूस्ती | 16.80 |
| मनपा योजना/कार्यक्रम पूर्ण करण्याकरीता अंशदान/ आर्थिक सहाय्य | 1.73 |
| इतर व्यय | 0.00 |
| कर्ज/व्याज/वित्तीय आकार (कर्ज परतफेड) | 5.31 |
| भांडवली व्यय | 15.82 |
| सर्व भांडवली कार्यात्मक समुहाचे एकुण अनुदान/ आर्थिक सहायता व्यय जेएनयुआरएम अंतर्गत विविध प्रकल्पाकरीता मनपाचा सहभाग | 18.02 |
| मनपा योजना व कार्यक्रम पूर्ण करणे/ अंशदान/ अनुदान व्यय | 0.00 |
| निक्षेप ठेवी व्यय | 5.17 |
| अग्रीम व्यय | 0.61 |

# नागपूर महानगर पालिकेचा मागील 3 वर्षाचे उत्पन्न दर्शविणारा तसेच 2013&14 चा सुधारीत तसेच 2014&15 चा प्रस्तावित आलेख




| | 2010–11 वास्तविक | 2011–12 वास्तविक | 2012–13 वास्तविक | 2013–14 आयुक्त द्वारा सुधारीत | 2014–15 आयुक्त द्वारा प्रस्तावित |
|---|---|---|---|---|---|
| जकात कर/स्थानिक संस्था कर | 36278.39 | 43741.83 | 47076.23 | 36000.00 | 44000.00 |
| मालमत्ता कर | 13255.66 | 12324.19 | 12990.16 | 18309.20 | 19136.32 |
| पाणी कर | 8970.80 | 7547.96 | 8147.69 | 12000.00 | 12500.00 |
| बाजार वसुली | 363.75 | 370.15 | 387.02 | 496.00 | 436.00 |
| सरकारी अनुदान | 5498.45 | 6252.79 | 5869.02 | 9851.83 | 9816.50 |
| कर्ज | 10000.00 | 1500.00 | 3500.00 | 0.00 | 0.00 |
| अग्रीम निक्षेप गुंतवणूक व इतर | 6412.11 | 9812.29 | 16042.59 | 20963.92 | 20251.92 |